# Editorial

महात्मा गांधी यांचे विचार स्वरूप आणि वास्तव या विषयावरील शोधनिबंधाचे ‘नवज्योत’ जर्नलमध्ये प्रकाशन होत आहे. ही बाब अत्यंत आनंदाची आहे. संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देणारे गांधीजी हे आपल्या कृतिशील विचारांना ‘महात्मा’ झाले. सत्य, अहिंसा व अशाकाराने स्वातंत्र्य प्राप्त करता येते हे त्यांनी जगाला दाखवून दिले. म.गांधीजीच्या विचारांची बैठक ही जगातील अनेक विचारवंत व तत्वज्ञ यांच्या वैचारिक योगदानान तयार झाली होती. विषमतावादी, समाजरचनेट सामाजिक अभिसरणाशिवाय समतामूल्य निर्माण होणार नाही. अनेक सामाजिक, राजकीय व आर्थिक विचार म. गांधीनी अत्यंत प्रभावीपणे मांडले. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही हे विचार मार्गदर्शक ठरतात. म्हणूनच पुन्हा गांधीच्या विचारांचे मंथन होणे ही काळाची गरज आहे.

सत्यासाठी जगलेल्या आणि सत्यासाठी मरण पत्करलेल्या महात्मा गांधी या व्यक्तिमत्वाने भारत देशावर नव्हे तर संपूर्ण जगावर स्वत:चा वैचारिक प्रभाव टाकलेला आहे. त्यामुळेच प्रत्येक शतकातील महनीय व्यक्तींनी मग ते राजकिय असोत की, सामाजिक, वैज्ञानिक क्षेत्रातील असोत त्यांनी महात्मा गांधी यांना सदैव वंदनीय मानलेले आहे. त्यामुळेच ‘म. गांधी नावाचा हाडामासांचा एक माणूस या पृथ्वीतलावर होऊन गेला. यावर पुढील पिढ्या कदाचित विश्वास ठेवणार नाहीत.’ असे उद्गार विख्यात शास्त्रज्ञ आईनस्टाईन यांनी काढलेले आहेत. तर नेल्सन मंडेला, मार्टिन ल्युथर किंग (ज्यु.) यांनी आपल्या सामाजिक चळवळींचा आधार म. गांधी यांचा विचार मानलेला होता.

आपल्या देशात व पर्यायाने जगभरातील अनेक कथा, कादंबऱ्या, कविता, सिनेमे, नाटक, वैचारिक ग्रंथ, समीक्षात्मक, तुलनात्मक ग्रंथ, विविध सामाजिक, राजकीय चळवळी यांच्यावर म. गांधींच्या विचारांचा प्रभाव दिसून येतो. या प्रभावाचा अभ्यास करण्याच्या उद्देशातूनच ‘म. गांधी यांचे विचार स्वरूप आणि वास्तव’ या प्रस्तुत मुख्य विषयाला मध्यवर्ती ठेऊन एकूण ५० उपविषयांवर आधारित आर्ट्स, कॉमर्स, सायन्स, विधी, सामाजिक शास्त्रे इत्यादी विभागातील प्राध्यापक वर्गांनी, संशोधक विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत आपले शोधनिबंध पाठवून दिले आहेत. या शोधनिबंधाचा विचार केला तर ज्या उद्देशाने प्रस्तुत ‘म. गांधी यांचे विचार स्वरूप आणि वास्तव’ हा विषय प्राध्यापक व संशोधक विद्यार्थीसमोर चिंतन, मनन व लेखनासाठी ठेवला होता तो सफल झाला असे वाटते.

धन्यवाद!